॥ सा विद्या या विमुक्तये ॥

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431 606 (Maharashtra)

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited 'B+++'grade

आज़ादी का अमृत महोत्सव

**MEETING & ELECTION SECTION**

| Phone : (02462) 229246<br>Fax : (02462) 229572 | Website:<br>Srtmun.ac.in | E-Mail :<br>election@srtmun.ac.in |
|---|---|---|


विद्यापीठ अध्यापकांमधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी मतदार यादी तयार करण्यासाठी माहिती पाठविण्याबाबत...

## अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम 28(2) नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या मा. अधिसभेचे नव्याने गठण करावयाचे आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम 28(2)(s) नुसार विद्यापीठ अध्यापक गटाने त्यांच्यामधून ०३ अध्यापक अधिसभेवर निवडून द्यावयाचे आहेत.

त्या अनुषंगाने विद्यापीठाने नियुक्त केलेले विद्यापीठ विभागांचे, विद्यापीठ परिसंस्थांचे आणि संचालित महाविद्यालयांचे पूर्णकालिक अध्यापक आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील अशा विद्यापीठ विभागांचे, विद्यापीठ परिसंस्थांचे आणि संचालित महाविद्यायांचे पूर्णकालिक अध्यापक यांनी मिळून बनलेला निर्वाचक गण तयार करावयाचा आहे.

तरी प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुलाचे संचालक, विद्यापीठ उप परिसराचे संचालक, विद्यापीठ परिसंस्थांचे संचालक आणि संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य व आस्थापना विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना या अधिसूचनेद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने आपल्या संकुल, विद्यापीठ उप परिसर, विद्यापीठ परिसंस्था, संचालित महाविद्यालयात कार्यरत असलेल्या सर्व अध्यापकांची आवश्यक ती सर्व माहिती यासोबतच्या विहित केलेल्या नमुन्यात भरून आवश्यक ते दस्तऐवज जोडून विद्यापीठास e-mail : election@srtmun.ac.in या मेलवर excel and pdf file मध्ये दिनांक ३०/०६/२०२२ पर्यंत पाठवून हॉर्ड कॉपीची प्रत विद्यापीठाच्या प्रशासकीय **इमारतीतील सभा व निवडणूक विभागात दिनांक ०४/०७/२०२२ सायं. ५.०० वाजेपर्यंत सादर करावी.**

विद्यापीठ अध्यापक यामधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, महाराष्ट्र शासन राजपत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २८ एप्रिल, २०१७ च्या अधिसूचनेतील पात्रता शर्ती, विहित नमुना यासोबत जोडलेले आहेत.

मान्यताप्राप्त विद्यापीठ अध्यापक यांच्या माहितीसोबत खालील कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित किंवा स्वक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे.

१. शासनमान्य पदावर विद्यापीठाने दिलेल्या नियुक्ती आदेशाची छायांकित प्रत.
२. अध्यापक राखीव प्रवर्गातील असल्यास त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची छायाकिंत प्रत.
३. नावात बदल झाला असल्यास नवीन नावाने नोंदणी करण्यासाठी शासन राजपत्र किंवा नवीन नाव असलेले आधार कार्ड यापैकी कोणताही एक पुरावा अर्जासोबत जोडावा.

वरील कागदपत्राची प्रत्येक शिक्षकाच्या नावाने एक पीडीएफ फाईल तयार करुन ती ई–मेलद्वारे प्रपत्रासोबत पाठविण्यात यावी.

वरीलप्रमाणे माहिती विहित मुदतीत प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील सभा व निवडणूक विभागात पाठवावी. ज्या संकूल, विद्यापीठ उप परिसर, विद्यापीठ परिसंस्था, संचालित महाविद्यालयात कार्यरत असलेल्या अध्यापकांची आवश्यक ती माहिती विहित मुदतीत प्राप्त होणार नाही, त्या अध्यापकांच्या नावाचा विद्यापीठ पूर्णकालिक मान्यताप्राप्त अध्यापकांनी मिळून बनलेल्या निर्वाचक गणामध्ये समावेश होणार नाही, त्यास सबंधित संकूलाचे संचालक, विद्यापीठ उप परिसराचे संचालक, विद्यापीठ परिसंस्थांचे संचालक आणि संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहील.

**कुलसचिव तथा**
**निवडणूक निर्वाचन अधिकारी,**
**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

**सोबत : वरीलप्रमाणे**

जा.क्रं. : सभा व निवडणूक/२०२२–२३/101
दिनांक : ०३/०६/२०२२

प्रति,
प्रस्तूत विद्यापीठातील सर्व संकुलाचे संचालक, विद्यापीठ उप परिसराचे संचालक, विद्यापीठ परिसंस्थांचे संचालक आणि संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य

Swami Ramanand Teerth Marathwada University Estd. 17Sep.94 Nanded

विहीत नमूना

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## विद्यापीठ शैक्षणिक विभागातील अध्यापकांची माहिती द्यावयाचा नमुना

विद्यापीठ शैक्षणिक संकुलाचे नाव : ............................................

| अ. क्रं. | अध्यापकांचे नाव पदनामासह (आडनाव प्रथम) | | शैक्षणिक अर्हता | जातीचा प्रवर्ग | सेवेत रूजू झाल्याचा दिनांक | जन्म तारीख | पदव्युत्तर स्तरावर शिकवत असलेले विषय | विद्या शाखा | पदवी स्तरावर अध्यापनाचा कालावधी व एकुण अनुभव | पदव्युत्तर अध्यापनाचा कालावधी व एकूण अनुभव | फोटो | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | देवनागरी | इंग्रजी | | | | | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, वरील माहिती सत्य असून, संबंधित कागदपत्रे तपासून दिली आहेत.

संचालक / प्राचार्य

संकुल / विभाग / महाविद्यालय .....................

Swami Ramanand Teerth Marathwada University Estd. 17 Sep. 94 Nanded

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**विद्यापीठ अध्यापक यामधून अधिसभेवर निवडून देण्यासंदर्भातील**
**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदी**

कलम २(१९) **'विद्यापीठ अध्यापकांचा गट'** याचा अर्थ, जे विद्यापीठाने नियुक्त केलेले विद्यापीठ विभागांचे, विद्यापीठ परिसंस्थांचे आणि संचालित महाविद्यालयाचे पूर्णकालिक अध्यापक आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील अशा, विद्यापीठ विभागांचे, विद्यापीठ परिसंस्थांचे आणि संचालित महाविद्यालयाचे पूर्णकालिक अध्यापक यांनी मिळून बनलेला निर्वाचक गण, असा आहे;

कलम २(६८) **'विद्यापीठ अध्यापक'** याचा अर्थ, विद्यापीठाने नियुक्त केलेला पूर्णकालिक अध्यापक, असा आहे.

कलम 28(2)(s) **'अधिसभा'**

विद्यापीठ अध्यापक गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे तीन अध्यापक, ज्यांपैकी एक आळीपाळीने अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग यांतील व्यक्ती असेल आणि एक महिला असेल;

**महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार—ब, उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय मुंबई दिनांक २८ एप्रिल २०१७ अन्वये अधिसूचनेतील विद्यापीठ अध्यापक यामधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात पात्रता शर्ती.**

कलम 28(2)(s) **'अधिसभा'**

विद्यापीठ अध्यापकांच्या गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले—

(क) पीएच.डी. पदवीधारक असावा आणि एकूण किमान दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असावा,

(ख) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्ष केलेले असावे.

Swami Ramanand Teerth Marathwada University Estd. 17Sep.94 Nanded

कुलसचिव तथा
निवडणूक निर्वाचन अधिकारी,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड